# <u>प्रेस नोट</u>

दिनांक २७/०७/२०१८

## नक्षल कमांडरच्या वडीलांनी काढली जिवंतपणी मुलाची अंत्ययात्रा.

दरवर्षी २८ जुलै ते ०३ आगस्ट दरम्यान नक्षलवादी नक्षल सप्ताह पाळतात सदर कालावधीत नक्षलवादयांनी सामान्य नागरिकांची हत्या करणे रोड रस्ते खोदणे, झाडे पाडणे, बॅनर लावणे, अशा कारवाया करुन लोकानमध्ये दहशत पसरवितात त्यासाठी लोकजनजागृती व्हावी म्हणून दिनांक २५/०७/२०१८ पासून दिनांक २७/०७/२०१८ रोजी पर्यंत जिल्हा पोलीस दलाचे वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय एटापल्ली तर्फे नक्षल शहिद सप्ताह निमीत्याने एटापल्ली तालुक्यातील सामान्य नागरिकांकरीता निवासी जनमैत्री मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्या दरम्यान सहभागी नागरिकांनी नक्षलवाद्यांमुळे सामान्य नागरिकांना नाहक त्रास होत असल्याची तिव्र भावना निर्माण झाली. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या विरोधात निषेध व्यक्त केल्याने नक्षल दलम कमांडर महेश गोटा यांचे वडील नामे रावजी गोटा रा. रेंगडीगुट्टा ता. एटापल्ली यांनी अंत्ययात्रा व नक्षलविरोधी मोर्चा काढण्याचे ठरविल्याने आज दिनांक २७/०७/२०१८ रोजी ११.३० वा. एटापल्ली येथील महसुल मंडळ कार्यालय येथून नक्षल डिव्हीजन कमाडंर जोगन्ना ऊर्फ धिसू ऊर्फ चिमला ऊर्फ नरसया लिंगया रा. करीमनगर तसेच नक्षल दलम कमाडंर महेश ऊर्फ शिवाजी रावजी गोटा रा. रेगडीगुट्टा उपपोस्टे कसनूसर याचे वडील नामे रावजी गोटा यांनी अंत्ययात्रा व नक्षलविरोधी मोर्चा काढून एटापल्ली शहरातील मुख्य मार्गाने जावून शिवाजी चौक येथे अंत्ययात्रेतील पुतळ्याचे दहन केले व महेश गोटा यास आत्मसमर्पण करण्याचे आवाहन केले. तसेच उपस्थित लोक व विद्यार्थी यांनी <u>*"नक्षलवाद मुर्दाबाद! लोकशाही जिंदाबाद!"*</u> अशा घोषणा देवुन नक्षलविरोधात निषेध केला. सदर अंत्ययात्रेदरम्यान एटापल्ली परिसरातील आजुबाजुचे लोक व विद्यार्थी मोठयाप्रमाणात सहभागी झाले होते. अंत्ययात्रे दरम्यान पुतळ्याचे दहन करून निषेध नोंदवून मुख्य मार्गाने परत येवून १३.४५ वा. कार्यक्रमाचे समाप्ती करण्यात आले.

सदर मोर्चाकरीता मा.श्री. किरणकुमार चंद्रकांत सुर्यवंशी, उपविभागीय पोलस अधिकारी एटापल्ली यांचे मार्गदर्शनाखाली मोर्चा बंदोबस्त प्रभारी श्री सपोनि. सचिन जगताप, प्रभारी अधिकारी पोस्टे एटापल्ली यांनी चोख पोलीस सुरक्षा बंदोबस्त पुरविले. नक्षलविरोधी मोर्चा व अंत्ययात्रा बंदोबस्त मधील पोउपनि. महेश पाटील, पोउपनि, अमित पाटील, पोउपनि, संजय राठोड, पोउपनि, अरूण डोंबे, पोउपनि. नवाज शेख व पोस्टे एटापल्ली व जलद प्रतिसाद पथक एटापल्ली येथील पोलीस कर्मचारी यांनी कोणताही अनुचित प्रकार घडू न देता बंदोबस्त शांततेत पार पाडले.


नक्षल विरोधी मोर्चा
एटापली


नक्षल विरोधी मोर्चा
एटापली


अंत यात्रा
क्रूर नक्षल महेश


नक्षल विरोधी मोर्चा
एटापली
अंत यात्रा

